ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे तत्कालीन सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-खांडके ता.अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग /ग्रापं-३/ई ऑफिस क्र.-१७०२४७५३
दिनांक-२८ /०८/२०२५

प्रति,

श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे तत्कालीन सेवानिलंबीत
ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-खांडके ता.अहिल्यानगर

**व्दारा :-** गट विकास अधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर / नेवासा

**वाचा :-** १.या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७०१/२०२२,
दिनांक- १०/१०/२०२२ (सेवा निलंबन)
२.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१/२०२३ दिनांक- २/०१/२०२३.
३.या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१५५/२०२३
दिनांक- १७/०२/२०२३ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
४.सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ /सी.आर.३८/२०२३, दिनांक- २६/०९/२०२३ (प्राप्त दिनांक १५/०१/२०२४)
५.विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१.
६.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ५)
७.ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक डीएनई-३५९०/
सीआर-१८४/२० दिनांक ८ मे १९९१.
८.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस ग्रा. पं.३/क्रमांक - ६६०६९३, दि.०४/११/२०२४ .
९.श्री.गर्जे यांनी सादर केलेला खुलासा दिनांक ०७/०१/२०२५.

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-खांडके ता.नगर यांना अन्वये सेवानिलंबीत करण्यात आलेले होते. संदर्भ क्र.२ नुसार त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन व गैरवव्यवहार केल्याने त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. क्र.३ नुसार श्री.गर्जे ग्रामपंचायत अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती. संदर्भ क्र.४ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.

**आरोप क्र.१:-** लालपूर विन्ड वर्ल्ड (पवनचक्की) या कंपनीचा कर रुपाने आलेला चेक रक्कम ६,७२,०००/- परस्पर खाते उघडून अपहार केले बाबत.
चौकशी अहवालातील आरोप क्रमांक -१ वरील निष्कर्ष -आरोप सिध्द होतो.

**आरोप क्रं.२**-ग्रामपंचायत सदस्यांनी मागणी केलेले बँक स्टेटमेंट न देता उडवाउडवीची उत्तरे देणे
चौकशी अहवालातील आरोप क्रमांक -२ वरील निष्कर्ष-आरोप सिध्द होतो.

**आरोप क्रं.३** - सन २०२० ते २०२२ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीच्या वेगवेगळया खातेमधून अंगणवाडी ल.ई.डी.समाजमंदीरासाठी एल.ई.डी. खरेदीमध्ये अनियमितता करणे.

चौकशी अहवालातील आरोप क्रमांक -३ वरिल निष्कर्ष-आरोप सिध्द होतो.

आरोप.क्रं.४ - सन २०२० ते २०२२ या कालावधीत जमा केलेली घरपट्टी व पाणीपट्टी ग्रामपंचायतीच्या बँक खात्यात न भरता हातावर शिल्लक ठेवणे.

चौकशी अहवालातील आरोप क्रमांक -४ वरील निष्कर्ष-आरोप सिध्द होतो.

आरोप क्र.५ - १४ वा वित्त आयोगातील काम बदल प्रस्तावात अनियमीतता करणे .

चौकशी अहवालातील आरोप क्रमांक -५ वरील निष्कर्ष-आरोप सिध्द होतो.

वरील प्रमाणे चौकशी अधिकारी यांच्यासमोर आलेली कागदपत्रे, साक्षीपुरावे व अपचारी यांचा बचाव या वरुन सर्व बाबींचा विचार करुन, चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| आरोप क्रमांक | निष्कर्ष |
| --- | --- |
| आरोप क्रमांक ०१ | आरोप सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ०२ | आरोप सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ०३ | आरोप सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ०४ | आरोप सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ०५ | आरोप सिध्द होतो. |

वरीलप्रमाणे श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी खांडके यांचे वर ठेवण्यात आलेले ०५ पैकी ०५ आरोप विभागीय चौकशी मध्ये सिध्द झालेले आहे. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शवून विभागीय चौकशी अहवांलातील निष्कर्ष पाहता श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन / गैरव्यवहार करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

सबब आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ५ ) नुसार, सक्तीने सेवानिवृत्त का करणेत येऊ नये ? या बाबतची नोटीस देण्यात आलेली होती.

श्री.दत्तात्रय विश्वासराव गर्जे यांचे खुलाश्याचे अवलोकन करुन त्यांना या आदेशान्वये खालीलप्रमाणे अ ते क नुसार समय श्रेणीत आणणेची शिक्षा अंतीम करण्यात येत आहे.

अ) श्री.गर्जे डी. व्ही. यांचा निम्न समय श्रेणीत आणण्याचे शिक्षेचा कालावधी हा तीन वर्षाचा असेल.

ब) श्री.गर्जे डी. व्ही. यांना उक्त शिक्षच्या कालावधीतील वेतनवाढ देय होणार नाहीत.

क) श्री.गर्जे यांचा शिक्षेचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्यांच्या भावी काळातील वेतनवाढी पुढे नियमित देय होतील.

या आदेशाची मुळ सेवापुस्तकात नोंद संबंधीत कार्यालयप्रमुख यांनी घेवून पुढील कार्यवाही करावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा **संकेतांक** २०२५०९२९०६०९५७ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2025 21:26:03
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर पुढील कार्यवाहीसाठी .